RNI No. MAHBIL./2009/35527

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-क

वर्ष ३, अंक ३०] शुक्रवार, ऑक्टोबर २१, २०११/आश्विन २९, शके १९३३ [पृष्ठे ७
किंमत : रुपये १२.००

## असाधारण क्रमांक ५८

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

### अधिसूचना

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक : मविनिआ/टीआरएफ/एमवायटी विनियम/२०११/०१८६१.—विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे, जसे की :—

१. **संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ.**—(१) या विनियमांना, " महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (पहिली सुधारणा) विनियम, २०११," असे म्हणावे.

(२) हे विनियम **शासकीय राजपत्रा**तील त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **विनियम ४.१ मध्ये सुधारणा.—**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ च्या (ज्यास यापुढे " बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ " असे म्हणण्यात येईल ) विनियम ४.१ मधील परंतुकानंतर खालील परंतुक जादा दाखल करण्यात येईल, जसे की :—

" परंतु आणखी असे की, वरील परंतुकाखाली, निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक यांच्या वर्गवारीला बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटी अंतर्गत विशिष्ट कालावधीसाठी एकूण महसुली गरज आणि / किंवा वीज दर निश्चितीकरणापासून सूट देण्यात आली असेल तर, सूट देण्यात आलेल्या कालावधीकरिता, अशा सर्व प्रकरणी, एकूण महसुली गरज आणि वीज दराच्या मंजुरीसाठी वार्षिक याचिका, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (वीज दराच्या अटी आणि शर्ती) विनियम, २००५, नुसार दाखल करण्यात येतील. "

३. **विनियम ६४.१.१ मध्ये सुधारणा.—**बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ च्या विनियम ६४.१.१ मधील परंतुकानंतर, खालील परंतुक जादा दाखल करण्यात येईल, जसे की :—

" परंतु आणखी असे की, या विनियमांच्या विनियम ४.१ च्या पहिल्या परंतुकाखाली बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटी अंतर्गत विशिष्ट कालावधीसाठी पारेषण परवानाधारकास एकूण महसुली गरज निश्चित करण्यापासून सूट देण्यात आली असेल तर, अशी सूट दिलेल्या कालावधीसाठी, वरील परंतुक लागू राहणार नाही. "

४. **विनियम ६४.२.१ मध्ये सुधारणा.—**बहु-वर्षीय वीज दराच्या विनियम, २०११ च्या विनियम ६४.२.१ मधील तिस-या परंतुकानंतर खालील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, या विनियमांच्या विनियम ४.१ च्या पहिल्या परंतुकानुसार जर पारेषण परवानाधारकाची एकूण महसुली गरज निश्चित करण्यापासून बहुवर्षीय वीज दराच्या चौकटीखाली विशिष्ट कालावधीकरिता सूट देण्यात आली असेल तर, अशी सूट देण्यात आलेल्या कालावधीकरिता, सर्व दीर्घकालीन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यासाठी बेस पारेषण क्षमता हक्कांचे निश्चितीकरण, अशी सूट देण्यापूर्वीच्या मागील १२ महिन्यात प्रचलित असलेल्या दीर्घकालीन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या कोइन्सिडंट सर्वोच्च मागणी (सीपीडी) आणि कोइन्सिडंट नसलेल्या सर्वोच्च मागणीच्या (एनसीपीडी) च्या मासिक सरासरीच्या आधारे, करण्यात येईल. "

५. **विनियम ६४.३.१ मध्ये सुधारणा.—**(एक) बहु-वर्षीय वीज दराच्या विनियम, २०११ च्या विनियम ६४.३.१ मधील दुसऱ्या परंतुकामधील " किंवा यंत्रणेमध्ये नवीन पारेषण परवानाधारकांची भर

पडल्यामुळे " हे शब्द वगळण्यात येतील आणि ते १ एप्रिल २०११ पासून वगळण्यात आले आहेत, असे मानण्यात येईल.

(दोन) बहु-वर्षीय वीज दराच्या विनियम, २०११ च्या विनियम ६४.३.१ मधील वरील सुधारित दुसऱ्या परंतुकानंतर खालील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, नियंत्रण कालावधीत राज्यांतर्गत पारेषण जाळ्यात जर नवीन पारेषण परवानाधारक आले तर, विनियम ६४.२ आणि ६४.३ मध्ये संदर्भ करण्यात आलेले बेस पारेषण क्षमता हक्क आणि बेस पारेषण दर हे नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता निश्चित करण्यात येतील. "

६. **नवीन विनियम १०२ समाविष्ट करणे.**—बहु-वर्षीय वीज दराच्या विनियम, २०११ मध्ये, विनियम १०१ नंतर खालील विनियम जादा दाखल करण्यात येईल :—

**" १०२. तात्पुरत्या ( ट्रॅन्झिटरी ) तरतुदी :—**

या विनियमांमध्ये काहीही विरुद्ध नमूद करण्यात आले असले तरी,—

(अ) ३१ मार्च २०११ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी आयोगाने निर्गमित केलेले वीज दराचा आदेश त्यानंतरही लागू राहील.

आणि

(ब) या विनियमाखाली समाविष्ट असलेल्या सर्व प्रकरणांकरिता १ एप्रिल २०११ पासून आर्थिक वर्ष २०१५-१६, म्हणजेच ३१ मार्च २०१६ पर्यंत व्यवसाय आराखडा आणि एकूण महसुली गरज, वीज दराच्या निश्चितीकरणासाठी वीज दर आणि आकारांपासूनचा अपेक्षित महसूल, यांची परिगणना करण्यासाठी याचिका, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ खाली दाखल करणे व त्यावर प्रक्रिया करणे चालू राहील.

परंतु असे की, विनियम ४.१ खाली सूट देण्याचा आदेश निर्गमित करण्यात आला असेल तर, संबंधित निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक, सूट देण्यात आलेल्या कालावधीकरिता, वार्षिक महसुली गरज आणि वीज दराच्या मंजुरीसाठी याचिका, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ खाली दाखल करतील.

परंतु आणखी असे की, विनियम ४.१ खाली जर निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकासाठी सूट देण्याचा आदेश नसेल तर आणि या विनियमाखाली १ एप्रिल २०११ पासून वीज दराचे निश्चितीकरण अंमलात आणण्यात अडचण असल्याबाबत

जर आयोगाचे समाधान झाले तर आणि या विनियमांखाली १ एप्रिल २०१२ पासून किंवा कोणत्याही पुढील कालावधीपासून वीज दराची निश्चिती करणे आवश्यक झाल्यास, सदर वीज दराच्या निश्चितीकरणासंबंधी रद्द करण्यात आलेले विनियम पुढेही अंमलात राहतील आणि १ एप्रिल २०१२ पर्यंतच्या कालावधीसाठी किंवा अशा पुढील कालावधीसाठी वीज दराच्या निश्चितीकरणाकरिता या विनियमांतील तरतुदी लागू राहणार नाहीत. ”

**कुलदीप ना. खवारे,**

सचिव,

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

ठिकाण : मुंबई,

दिनांक : २१ ऑक्टोबर २०११.

**टिपणी :—**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११, दिनांक ४ फेब्रुवारी २०११ रोजी **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करण्यात आले आहेत.